# मुंबई विद्यापीठ

---

## परिपत्रक

No. Enrol/Elg./admission/(2020-21)/1823 of 2020

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांचे प्राचार्य, /मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, संचालक, उपपरिसर (ठाणे व रत्नागिरी) यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाने Enrol/Elg./admission/(2020-21)/1817 of 2020 दिनांक २१ जुलै, २०२० व Enrol/Elg./admission/(2020-21)/1822 of 2020 दिनांक ४ ऑगस्ट, २०२० अन्वये प्रथम वर्ष (First Year) प्रवेश प्रक्रियेबाबत वेळापत्रक (Time Table) जाहिर केले होते, त्यानुसार दिनांक ५ ऑगस्ट, २०२० रोजी विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया नोंदणी लिंक बंद करण्यात आली होती व वेळापत्रकाप्रमाणे दिनांक ०६ ऑगस्ट, २०२० रोजी पहिली गुणवत्ता यादी (First Merit List) जाहीर करण्यात आलेली आहे परंतु अतिवृष्टी/वादळामुळे इंटरनेटची व विजेची सेवा विस्कळीत झाल्यामुळे काही विद्यार्थी www.mum.digitaluniversity.ac या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेश नोंदणी करु शकले नाहीत, त्यामुळे अश्या विद्यार्थ्यांसाठी www.mum.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरील प्रवेश नोंदणी लिंक दिनांक ७ ऑगस्ट २०२० रोजी सकाळी ११.०० पासून प्रवेश नोंदणीसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदरची लिंक ही विद्यार्थ्यांना दिनांक १४ ऑगस्ट, २०२० रोजी संध्याकाळी ६.०० वाजे पर्यंत नोंदणीसाठी खुली असेल या लिंक मधुन विद्यार्थ्यी आपली प्रवेश नोंदणी करु शकतील. जे विद्यार्थी दिनांक ७ ऑगस्ट, २०२० पासून प्रवेश नोंदणी करतील अश्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांनी तिस—या गुणवत्ता यादीची (Third Merit List) प्रवेश प्रकिया पुर्ण झाल्यानंतर गुणवत्ता यादीत समावेश करुन प्रवेश प्रकियेत सामील करावे. सदर विद्यार्थ्यांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असेल त्या महाविद्यालयाची तिसरी गुणवत्ता यादी जाहिर झाल्यानंतर संबधित महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरावे लागतील.

तरी, सदरची बाब ही सर्व संबधित महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यार्थी व प्रवेश प्रक्रियेशी संबधित सर्वांच्या निदर्शनास आणुन दयावी.

**ठिकाण : मुंबई -४०००३२** — **(डॉ. विनोद पाटील)**

**दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२०** — **प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी —**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक.

स्वीय सहाय्यक :१)कुलगुरु २)प्र—कुलगुरु ३)कुलसचिव ४)संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ.